11 OCT 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'बेटी बचाओ' जनचळवळ होण्यास कुराडे यांचे योगदान

## कुलगुरू डॉ. शिर्के : दहा पुस्तकांचे प्रकाशन

कोल्हापूर : प्रतिनिधी

प्रा. किसनराव कुराडे-पाटील लिखित चिंगीचा माईंडसेट, भ्रूणकन्येचा आत्मध्वनी, चिंगीची भरारी, बिटिया का जीवनदान पत्र, आई...दार उघड... आदी पुस्तकांच्या माध्यमातून प्रा. कुराडे यांनी बेटी बचाओ अभियान राबवण्यासाठी योगदान दिले आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

स्वयंभू यशवंतराव घाटगे संस्थानिक शाहू महाराज झाले नसते, तर...!!, गुरुकुलातील कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार : काळ आणि कर्तृत्व, आत्मदर्शन, शिक्षणशाईल व्ही. टी. पाटील : काळ आणि कर्तृत्व, जीवनदान यज्ञ आदी पुस्तकांचे प्रकाशन विद्यापीठाचे बेटी बचाओ अभियान, शिवराज विद्या संकुल व वाचनकट्टा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे प्रा. किसनराव कुराडे पाटील लिखित दहा पुस्तकांचे प्रकाशन करताना कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के. सोबत मान्यवर.

प्रा. किसनराव कुराडे म्हणाले, साठ वर्षांपूर्वी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार व व्ही. टी. पाटील यांच्या सान्निध्यात जडणघडण झाली. कमवा व शिका योजनेतून शिक्षण झाले.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, कुराडे यांनी लिहिलेली थोरामोठ्यांची चरित्रे जिज्ञासू वाचकांनी चिकित्सकपणे वाचली पाहिजेत. प्रास्ताविक बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले आहे. प्रा. जी. पी. माळी, हसन देसाई, सिद्धार्थ लाटकर, श्याम कुरळे, डॉ. सुनील देसाई, अॅड. दिग्विजय कुराडे, बसवराज आजरी, एम. डी. देसाई, ईश्वर देसाई, मोहन कवटेकर, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. ज्योती जाधव आदींची प्रमख उपस्थिती होते. आभार वाचनकट्टाचे अध्यक्ष युवराज कदम यांनी मानले. सूत्रसंचालन उज्ज्वला पाटील यांनी केले.

11 OCT 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कविता जगण्याचे अवमूल्यन रोखते : डॉ. राजन गवस

कोल्हापूर : माणसाने कितीही प्रगती केली, तरी त्याच्या सांस्कृतिक विकासासाठी कवितेची आवश्यकता असते. यंत्रे माणसाची किंमत कमी करतात, तर कविता जगण्याचे अवमूल्यन रोखते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे सन २०२३ च्या सतीश काळसेकर व ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कारांच्या प्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थित होती. ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी–कवठेकर यांना काव्य क्षेत्रातील मौलिक योगदानाबद्दल सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, तर कवी वर्जेश सोळंकी यांना आश्वासक कवितालेखनासाठी ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान केला. आदित्य काळसेकर यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, महेश लीला पंडित, डॉ. प्रकाश पवार, डॉ. प्रभंजन माने, डॉ. औदुंबर सरवदे, डॉ. अवनिश पाटील, डॉ. पवार उपस्थित होते.

सकाळ

# 'डॉ. पंजाबराव देशमुख : विचार, कार्य' चर्चासत्र

**कोल्हापूरः** शिवाजी विद्यापीठात 'डॉ. पंजाबराव देशमुख : व्यक्ती, विचार आणि कार्य' या विषयावर दोनदिवसीय चर्चासत्र बुधवार (ता. ११) पासून होणार आहे. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी ११ वाजता अमरावती येथील श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असतील. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे बीजभाषण होणार आहे. विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग, गांधी अध्ययन केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्यासन आणि श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाने चर्चासत्र आयोजित केले आहे.

पुढारी

# कार्पोरेट जनसंपर्कात विविध संधी : यादव

कोल्हापूर : कार्पोरेट जनसंपर्कामध्ये करिअरच्या अनेक संधी असून त्यासाठी विविध कौशल्य आत्मसात केली पाहिजेत, असे प्रतिपादन चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे जनसंपर्क अधिकारी सचिन यादव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागात 'कार्पोरेट पब्लिक रिलेशन्समधील विविध संधी' या विषयावर ते बोलत होते. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठातर्फे काळजवडे, सावतवाडीत गाव सहभागी मूल्यावलोकन शिबिरांना प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभागाच्या समाजकार्य अभ्यासक्रमांतर्गत गावसहभागी मूल्यावलोकन शिबिरांना मौजे काळजवडे (ता. पन्हाळा), सावतवाडी (गर्जन ग्रामपंचायत, ता. करवीर) येथे सुरुवात झाली. शिबिरांतर्गत समाजकार्य अभ्यासक्रमाचे विद्यार्थी १४ ऑक्टोबरपर्यंत गावांचा सूक्ष्म अभ्यास करून ग्रामविकासास उपयुक्त कार्यक्रम राबविणार आहेत. मशालफेरी, ग्रामबैठक व पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती केली जाईल. डॉ. उमेश गडेकर काळजवडे येथील शिबिराचे समन्वयक आहेत. श्रेयश सरदार, श्रीअर्या लोंढे, खंडेराव पाटील, विद्या माने, अंजली बल्लारी, सिमरन आगा, कांबळे गायत्री, अश्विनी कांबळे हे समाजकार्य अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. सरपंच शामराव पाटील, उपसरपंच प्रकाश पाटील, ग्रामसेवक रामकृष्ण वाघमारे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

तरूण भारत

# विद्यापीठातर्फे पन्हाळा तालुक्यात मूल्यावलोकन शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभागाच्या समाजकार्य अभ्यासक्रमांतर्गत गावसहभागी मूल्यावलोकन शिबिराभ्ं मौजे काळजवडे (ता. पन्हाळा,) आणि सावंतवाडी (गर्जन ग्रामपंचायत,) येथे सुरुवात झाली आहे. १४ ऑक्टोबरपर्यंत या शिबिरांतर्गत समाजकार्य अभ्यासक्रमाचे विद्यार्थी गावांचा सूक्ष्म अभ्यास करून ग्रामविकासास उपयुक्त कार्यक्रम राबविणार आहेत. काळजवडे येथील शिबिराचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर असून श्रेयश सरदार, श्रीअर्या लोंढे, खंडेराव पाटील, विद्या माने, अंजली बल्लारी, सिमरन आगा, कांबळे गायत्री, अश्विनी कांबळे हे समाजकार्य अभ्यासक्रमाचे विध्यार्थी सहभागी झाले आहेत. सरपंच शामराव पाटील, उपसरपंच प्रकाश पाटील, ग्रामसेवक रामकृष्ण वाघमारे,ग्रामपंचायत सदस्य व ग्रांमस्थ सहभागी झाले आहेत.

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठात 'जागतिक मानसिक आरोग्य दिना' निमित्त विविध अधिविभागांसमोर रॅली व पथनाट्याचे सादरीकरण केले.

# शिवाजी विद्यापीठात मानसिक आरोग्य दिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मानसशास्त्र अधिविभाग आणि व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक मानसिक आरोग्य दिना'चे आयोजन केले होते. याप्रसंगी अधिविभागातील विद्यार्थ्यांनी केलेल्या पोस्टर प्रदर्शनाचे उद्‌घाटन 'वायसीएसआरडी'चे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी अधिविभागाचे प्र-विभागप्रमख डॉ. सुभाष कोंबडे उपस्थित होते. डॉ. माळी म्हणाले, समाजाचे मानसिक स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करायला हवेत. मानसशास्त्र विभाग यामध्ये निश्चितच पुढाकार घेईल. डॉ. अश्विनी पाटील यांनी प्रास्ताविक केले. अधिविभागातील विद्यार्थ्यांनी विविध अधिविभागांसमोर रॅली व पथनाट्याचे सादरीकरण केले. यावेळी डॉ. साक्षी गावडे, डॉ. मिलिंद सावंत, डॉ. विशाल पाटील, समुपदेशक सत्यजित देसाई उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठात मानसिक आरोग्य दिन साजरा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मानसशास्त्र अधिविभाग आणि व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समूपदेशन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे' आयोजन केले होते. अधिविभागातील विद्यार्थ्यांच्या पोस्टर प्रदर्शनाचे वायसीएसआरडीचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी यांच्या हस्ते केले.अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. सुभाष कोंबडे होते. प्रास्तविक डॉ. अश्विनी पाटील यांनी केले. डॉ. साक्षी गावडे, डॉ. मिंलिद सावंत, डॉ. विशाल पाटील, समुपदेशक सत्यजित देसाई, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

सकाळ

# गुणांमध्ये फेरफार झाल्याची शिवाजी विद्यापीठाकडून तपासणी

## अजितसिंह जाधव : दुबार गुणपत्रिकांबाबत चुकीची कार्यवाही नाही

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : चुकीच्या पद्धतीने प्राप्त केलेल्या दुबार गुणपत्रिका, त्यांची मूळ गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्रे जमा करण्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांला कळविले आहे. याप्रकरणी शिवाजी विद्यापीठाने कोणतीही चुकीची कार्यवाही केलेली नाही. न्यायिक चौकशी करून आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कारकीर्दीचा विचार करून अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णय व कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाही केली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आज दिली.

मार्च-एप्रिल-२०१९ या उन्हाळी सत्रातील परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर प्रशासकीय स्तरावर काही विद्यार्थ्यांच्या गुण आणि निकालामध्ये फेरफार झाल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले. त्या अनुषंगाने गठीत झालेल्या सत्यशोधन समितीने सखोल तपासणी करून काही प्रकरणे निदर्शनास आणली. या प्रकरणामध्ये निकाल घोषित झाल्यानंतर परीक्षा विभागाने गुणपत्रके वितरीत केल्यानंतर गुणांमध्ये फेरफार झाल्याचे आणि विद्यार्थ्यांनी फेरफार गुणांसह दुबार गुणपत्रके विद्यार्थी सुविधा केंद्राकडून प्राप्त केल्याचे निदर्शनास आले. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार गठीत परीक्षा प्रमाद समितीपुढे संबंधित प्रकरणे सादर केली.

परीक्षा प्रमाद चौकशी समितीने या प्रकरणी विद्यार्थ्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली. या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून त्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिकेवर असणारे गुण घेऊन निकाल घोषित करण्याचा निर्णय दिला. त्यानुसार निकाल पुनश्च घोषित केला असल्याची माहिती डॉ. जाधव यांनी दिली.

### 'त्या' विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी

- अधिकार मंडळाच्या मान्यतेने जे विद्यार्थी मूळ गुणानुसार अनुत्तीर्ण झालेले आहेत. त्यांना परीक्षा देण्यासाठी अधिकच्या संधी देण्यात आलेल्या आहेत. याबाबत 'त्या'अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा मंडळाने पत्राद्वारे कळविले असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.